# शिक्षकांसाठी सूचना

## इयत्ता : आठवी

## लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

(गुण ६)

**प्रश्न १): शब्द ऐकून लिही.**

क्षेत्र : लेखन (श्रुतलेखन)

उद्‌दिष्ट : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

सूचना : यादीतील शब्द सांगताना प्रत्येक शब्द मोठ्याने तीन वेळा वाचावा.

शब्द :

| | |
|---|---|
| १) विमान | २) खडू |
| ३) थैली | ४) अंगण |
| ५) गॅस | ६) रॉकेल |
| ७) पट्‌टी | ८) जास्वंद |
| ९) कात्री | १०) ज्वारी |
| ११) बर्फ | १२) राष्ट्रीय |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण द्यावा.**

हा प्रश्न तपासताना काही बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखन नियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'जास्वंद' ऐवजी 'जासवंद' किंवा 'बर्फ' ऐवजी 'बरफ'/'र्बफ'/'बफ्र' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

(गुण ४)

**प्रश्न २): हा उतारा ऐक आणि लिही.**

क्षेत्र : लेखन (श्रुतलेखन)

उद्‌दिष्ट : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्द असलेल्या मजकुराचे लेखन तपासणे.

सूचना :

- उतारा सांगताना त्याचा अर्थ ध्यानी यावा म्हणून एक एक वाक्य सलगपणे सांगावे.
- मग वाक्यातील शब्दांचे अर्थपूर्ण गट करून एक गट सांगून झाल्यावर काही सेकंद थांबावे. मग पुढील गट सांगावा. याप्रमाणे प्रत्येक वाक्य सांगावे.
- उतारा पूर्ण झाल्यावर संपूर्ण उतारा मुलांना सावकाशपणे वाचून दाखवावा व तपासण्यास सांगावे.

**उतारा** : आज कबड्डीची मॅच होती. मी मैदानावर पोहोचलो तेव्हा सगळे खेळाडू उत्साहात होते. खेळ रंगात आला होता. अचानक प्रमिला पडली. तिच्या पायाला खूपच लागलं. तन्मय धावत आला. त्याने प्रमिलाचा पाय पाण्याने स्वच्छ धुतला. जखमेवर कापसाने औषध लावले.

**गुणदान** :
- एकही शब्द बरोबर नाही – शून्य गुण (शिरोरेखा व पूर्णविरामाचे गुणही देऊ नयेत.)
- शिरोरेखा असतील तर – अर्धा गुण
- पूर्णविराम असतील तर – अर्धा गुण
- १–१२ शब्द बरोबर – एक गुण
- १३–२४ शब्द बरोबर – दोन गुण
- २५–३६ शब्द बरोबर – तीन गुण

**प्रश्न ३ ते ५ :** कविता वाच आणि खालील प्रश्नांची उत्तरे बरोबर लिही. (पठित १५० शब्द) (गुण ५)

*हिरवी झाडी, पिवळा डोंगर*
*निळी सावळी दरी,*
*बेट बांबूचे त्यातून वाजे*
*वाऱ्याची पावरी.........*

**योग्य उत्तरे :**

**प्रश्न ३ : ब)** डोंगरदऱ्यांचे (गुण १)

**प्रश्न ४ :** हिरवा/हिरवी/हिरवी झाडी/हिरवी मखमल,
निळा/निळी/निळी सावळी दरी, काळा/कभिन्न काळा,
शुभ्र/पांढरा, पिवळा/पिवळा डोंगर/पिवळी पाकोळी
(प्रत्येक योग्य रंगाच्या उल्लेखासाठी अर्धा गुण याप्रमाणे एकूण २ गुण)

**प्रश्न ५ :** *गोजिरवाणे करडू होऊन काय इथे बागडू?*
*पाकोळी का पिवळी होऊन फुलाफुलांतून उडू?*
(या दोन्ही ओळी आल्या तरच दोन गुण द्यावेत.)

**प्रश्न ६ ते ८ :** हा उतारा वाच आणि खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिही. (अपठित १५० शब्द) (गुण ५)

वाघ हा आपला राष्ट्रीय प्राणी आहे. भारतातील 'रॉयल बेंगॉल टायगर' या बंगालमध्ये असणाऱ्या वाघाच्या प्रजातीचे जगभर आकर्षण आहे....

**योग्य उत्तरे :** (मुलाने संदर्भ लक्षात घेऊन स्वतःच्या शब्दांत लिहिलेले उत्तर स्वीकारावे.)

**प्रश्न ६):** वाघांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले गेले व 'व्याघ्र प्रकल्प' सुरू करण्यात आला. त्याचबरोबर 'टायगर टास्क फोर्स' ची सुद्धा स्थापना झाली.

(व्याघ्र प्रकल्प व टायगर टास्क फोर्स हे दोन्ही मुद्दे आल्यास १ गुण द्यावा. एकच मुद्दा लिहिल्यास अर्धा गुण द्यावा.)

**प्रश्न ७):** वाघांची नखे, दात, हाडे, कातडी यांना आंतरराष्ट्रीय बाजारात लाखो रुपयांची किंमत आहे. चीनमध्ये वाघांच्या अवयवांपासून पारंपरिक औषधे बनविली जातात.

(वरील दोन्ही कारणे लिहिल्यास दोन गुण द्यावेत. एकच कारण लिहिल्यास एक गुण द्यावा.)

**प्रश्न ८):** १८ व्या शतकापर्यंत आपल्या देशात वाघांची संख्या ४०,००० होती; परंतु १९७२ च्या दरम्यान ही संख्या अंदाजे १८०० पर्यंत खाली आली.

(वाघांची संख्या ४०,००० वरून १८०० पर्यंत कमी झाली याचा उल्लेख आल्यास दोन गुण द्यावेत. फक्त संख्या १८०० पर्यंत खाली आली असे लिहिल्यास एक गुण द्यावा.)

**प्रश्न ९ ते ११ :** हा उतारा वाच आणि खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिही. (अपठित १५०शब्द) (गुण ५)

**उतारा :** मुहूर्तावर निघालेली पहिली आगगाडी ठाण्याला जाऊन मुंबईला सुखरूप परत आली. पण त्या वाफेच्या भूताटकीच्या गाडीत बसायचा लोकांना धीरच होईना....

**योग्य उत्तरे :**

**प्रश्न ९ : अ)** मुंबई - ठाणे (गुण १)

**प्रश्न १०: क)** वरील दोन्ही (गुण २)

**प्रश्न ११: क)** गाडी वाफेवर चालते यावर लोकांचा विश्वास नव्हता. (गुण २)

**प्रश्न १२ ते १९ :** खालील वाक्यात सूचनेनुसार बदल कर. (गुण १०)

**योग्य उत्तरे :**

**प्रश्न १२: क)** सूर्य + उदय (गुण १)

**प्रश्न १३: अ)** जगत् + नाथ (गुण १)

**प्रश्न १४:** क्रिकेटचा सामना पाहण्यात मुले दंग होती. (गुण १)
(दंग होणे असे लिहिल्यास अर्धा गुण द्यावा.)

**प्रश्न १५:** शेतकरी शेतात हाडाची काडे करतात. (गुण १)
(हाडाची काडे करणे असे लिहिल्यास अर्धा गुण द्यावा.)

**प्रश्न १६:** उस्मान, परेश, रुबी, रोहन, सना
(हा सर्व क्रम योग्य लिहिल्यास एक गुण द्यावा.)

**प्रश्न १७:** सीमा म्हणाली, ''माधवकाका, तुम्ही आंबे का आणले?''
(उद्‌गारवाचक चिन्हांऐवजी प्रश्नचिन्ह वापरल्यास एक गुण द्यावा.)

**प्रश्न १८:** १) आम्ही मुले मैदानावर विटीदांडू खेळत होतो.
२) आईने केलेली पुरणपोळी नयनाला खूप आवडते.
(प्रत्येकी एक याप्रमाणे दोन गुण द्यावेत.)

**प्रश्न १९:** आजीने मुलांना गोष्ट सांगितली. (गुण १)

**प्रश्न २०:** अ) आशीर्वाद (गुण १)

**प्रश्न २१:** शाळेत साजरा झालेल्या समारंभाचा अहवाल लिही. (गुण ५)

| गुण | **निकष** |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा विषयाला सोडून केलेले असंबद्ध लिखाण किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | सुट्या-सुट्या वाक्यांचे किंवा काही शब्द बदलून वाक्यांचे परत-परत केलेले लेखन. |
| २ | अहवाल स्वरूपात लेखन नाही. मात्र दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर लेखन करण्याचा प्रयत्न.<br>• वाक्यरचना विस्कळित.<br>• मुद्द्यांचा नेमकेपणा नाही. |
| ३ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाक्यरचना बऱ्यापैकी नीट आहे.<br>• लेखन तुटक-तुटक आहे. एका विषयाकडून दुसऱ्या विषयाकडे जाताना सुसंगतपणा दिसत नाही.<br>• घटनांचा उल्लेख मर्यादित शब्दांत केलेला आहे. |
| ४ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन आहे.<br>• मर्यादित मुद्दे नेमक्या शब्दात मांडले आहेत.<br>• लेखनात काही ठिकाणी सुसंगतपणा आढळतो.<br>• घटनांचा उल्लेख थोडा विस्ताराने केला आहे. |
| ५ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन केले आहे.<br>• लेखन सुसंगत झाले आहे.<br>• विषयाला धरून मुद्दे नेमक्या शब्दात मांडले आहेत.<br>• घटनांचा विस्तार, तपशिलाचे बारकावे नेमक्या शब्दात मांडल्याने लेखन प्रभावी झाले आहे.<br>• अहवालाची रचना नीट झाली आहे. (उदा. अहवालाची सुरुवात, कार्यक्रमाचा तपशील, अहवालाचा शेवट) |

**प्रश्न २२ :** दिलेल्या घटनेवर तुझे मत व्यक्त कर. (गुण ५)

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा विषयाचा संदर्भ न घेता केलेले असंबद्ध लिखाण. |
| १ | दिलेल्या विषयाचा विचार न करता सुट्या सुट्या वाक्यांचे लेखन. |
| २ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार केला आहे.<br>• काही ठिकाणी संदर्भ वापरून लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे.<br>• वाक्यरचना नीट नाही. |
| ३ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार करून मत मांडल्याचे दिसते.<br>• लेखनाची रचना विस्कळीत आहे, लेखनापूर्वीचे नियोजन दिसत नाही.<br>• 'लेखनाचा शेवट पूर्ण केलेला नाही. |
| ४ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार केला आहे.<br>• दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार करून मत मांडल्याचे दिसते.<br>• मत मांडताना लेखनाची ढोबळ रचना केलेली आहे.<br>• मत व्यक्त करताना सुरुवात व शेवट आहे.<br>• वाक्यरचना काही ठिकाणी विस्कळीत आहे.<br>• स्वतःचे मत व्यक्त करताना काही ठिकाणी संदर्भ सुटल्यामुळे लेखन तुटक तुटक वाटते. |
| ५ | • दिलेल्या विषयावर सखोल विचार करून मत मांडल्याचे दिसते<br>• मत मांडताना लेखनाची एक विशिष्ट रचना केलेली आढळते. लेखनापूर्वीचे नियोजन दिसते.<br>• वाक्यरचना नीट आहे.<br>• स्वतःचे मत व्यक्त करताना सुसंगत सुरुवात व शेवट आहे, त्यामुळे लेखन ओघवते वाटते.<br>• लिहिताना आजुबाजूच्या उदाहरणाचे दाखले दिल्याने लेखन प्रभावशाली वाटते.<br>• शेवट करताना सकारात्मकरित्या घटना कशी हाताळता येऊ शकते याचे थोडक्यात स्पष्टीकरण आले आहे. |

**प्रश्न : २३)** सामाजिक समस्येविषयी औपचारिक पत्र लिही. ( गुण ५)

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या संदर्भाचा विचार न करता केलेले असंबद्ध लिखाण. |
| १ | दिलेल्या विषयाचा विचार करून वाक्यांचे सुटे सुटे लेखन. |
| २ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार करून लेखन केले आहे; पण<br>• पत्र स्वरूपात लेखन नाही.<br>• वाक्यरचना नीट नाही.<br>• लिहिताना विस्तारीत तपशील दिलेला नाही, विषयाची मांडणी काहीच शब्दांत केलेली आहे. |
| ३ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र स्वरूपात लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• विषयाचा आशय लक्षात येईल असे मुद्दे मांडलेले आहेत.<br>• लिखाणात सलगता, सुसंगतपणा नाही, पत्राचा आणि वाक्यांचा प्रवाह तुटक-तुटक वाटतो.<br>• विषयाचा विस्तार थोडक्यात आणि मर्यादित केलेला आहे. |
| ४ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र स्वरूपात लेखन केले आहे.<br>• विषयाला धरून पत्राची सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• विषयाच्या तपशीलाचा मुद्देसुद विस्तार करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| ५ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र स्वरूपात लेखन केले आहे.<br>• पत्राला सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• विषयाच्या तपशीलाचा मुद्देसूद विस्तार केला आहे.<br>• पत्र लिहिताना लिखाणाचा आशय विनंतीवजा असावा याचे भान ठेवले आहे.<br>• विषयाचे गांभीर्य व समस्येबद्दलची स्वतःची भूमिकाही स्पष्ट केली आहे. |

# तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**तोंडी प्रश्न १ :** उताऱ्याचे प्रकटवाचन करून घेणे. (गुण ५)

**क्षेत्र** : प्रकटवाचन

**उद्‌दिष्ट** : वाचून आकलन तपासणे.

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे. हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे. वर्गात जास्त मुले असल्यास चार ते पाच दिवसात हा चाचणीचा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :**

मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी तुला काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

काल रविवार होता. मनू आई-बाबांबरोबर डोंगरावर फिरायला गेली होती. मनू तर डोंगरावर चढताना जवळ-जवळ पळतच होती. आई म्हणाली, ''अगं किती धावतेस?'' मनू म्हणाली, ''काही नाही होत गं, मला मजा येतेय.'' असे म्हणत मनू पुढे पळाली. तिला आई-बाबांच्या आधी डोंगरावर पोहचून सूर्योदय पाहायचा होता. मनू सूर्योदय बघत उभी होती. तेवढ्यात आई-बाबा धापा टाकतच आले. आईला बघताच मनू म्हणाली, ''आई, मला भूक लागली.'' आईने दिलेला लाडू मनूने लगेचच फस्त केला. मनू आई-बाबांबरोबर मनसोक्त भटकून घरी परत आली.

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन, वाचनातून वाक्याचा बोध. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही. वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**वाचलेल्या उताऱ्यावर आधारित प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २** : मनू डोंगरावर का पळत होती? (गुण १) (क)

अ) तिला घरी जायची घाई झाली होती.

ब) तिला भूक लागली होती.

क) तिला मजा येत होती.

**तोंडी प्रश्न ३** : मनू डोंगरावर फिरायला कोणत्या वेळी गेली होती? (गुण २) (अ)

हे तुला कशावरून समजले?

अ) सकाळी

ब) दुपारी

क) संध्याकाळी

(सकाळी असे उत्तर दिल्यास एक गुण द्यावा. सूर्योदय पाहायचा होता या वाक्यावरून सकाळी फिरायला गेली हे समजले असे सांगितले तर उर्वरित एक गुण द्यावा.)

**तोंडी प्रश्न ४** : आई बाबा डोंगर चढताना थकले होते हे तुला कोणत्या वाक्यावरून सांगता येईल? (गुण२)

('आई-बाबा धापा टाकतच आले' असे उत्तर दिल्यास दोन गुण द्यावेत.)

■■■

इ. ८वी मराठी - ९

## उतारा :

काल रविवार होता. मनू आई-बाबांबरोबर डोंगरावर फिरायला गेली होती. मनू तर डोंगरावर चढताना जवळ-जवळ पळतच होती. आई म्हणाली, ''अगं किती धावतेस?'' मनू म्हणाली, ''काही नाही होत गं, मला मजा येतेय.'' असे म्हणत मनू पुढे पळाली. तिला आई-बाबांच्या आधी डोंगरावर पोहचून सूर्योदय पाहायचा होता. मनू सूर्योदय बघत उभी होती. तेवढ्यात आई-बाबा धापा टाकतच आले. आईला बघताच मनू म्हणाली, ''आई, मला भूक लागली.'' आईने दिलेला लाडू मनूने लगेचच फस्त केला. मनू आई-बाबांबरोबर मनसोक्त भटकून घरी परत आली.